# कार्यालयीन परिपत्रक

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना कार्यान्वित आहे. सदर अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत पुणे महानगरपालिका सेवक, सेवानिवृत्त सेवक शिक्षण मंडळ व पीएमपीएमएल विभागाकडील सेवक / सेवानिवृत्त सेवक, मा.आजी व मा.माजी सभासद यांची वैद्यकीय उपचारार्थ वैयक्तिक स्व खर्चाची वैद्यकीय परतावा बिले सादर करुन त्यांची वैद्यकीय बिले प्रतिपूर्ती करण्यात येत आहेत.

आर्थिक वर्ष सन २०२३-२४ पासून पुढील दर आर्थिक वर्षात उपरोक्त नमूद सेवक, सेवानिवृत्त सेवक, मा. आजी व मा.माजी सभासद यांनी वैयक्तिक खर्चाची वैद्यकीय परतावा बिले हि त्या-त्या आर्थिक वर्षातच सादर करावी. तसेच सदर रुग्ण मनपा सेवक/सेवानिवृत्त सेवक, शिक्षण मंडळ व पीएमपीएमएल विभागाकडील सेवक / सेवानिवृत्त सेवक अथवा मा.आजी / मा.माजी सभासद हे जर दि.३१/०३/२०२३ ला रुग्णालयात दाखल झाल्यास त्यांनी सदर वैद्यकीय परतावा बिल हे पुढील आर्थिक वर्षातील माहे एप्रिल अथवा रुग्णांचा रुग्णालयातील डिस्चार्ज प्रमाणे जी गोष्ट आधी घडली आहे त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत बिले सादर करण्यात यावीत. तसेच या पुढील काळात त्या- त्या आर्थिक वर्षात वैयक्तिक वैद्यकीय परतावा बिल सादर न केल्यास त्या बिलांचा परतावा मिळणार नाही याची सर्व सेवकांनी नोंद घ्यावी.

30/5/2023
(डॉ.मनिषा विनोद नाईक)
सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणेमहानगरपालिका

30/5/2023
(डॉ.कल्पना बळीवंत)
प्र.आरोग्य अधिकारी
पुणेमहानगरपालिका

प्रत:-१)सर्व मा.खातेप्रमुख/मा.महापालिका सहाय्यक आयुक्त/
परिमंडळे/क्षेत्रीय कार्यालये पुणे महानगरपालिका
२)माध्यमिक शिक्षण विभाग/उच्च माध्यमिक व तंत्र शाळा पुणे मनपा
३)प्राथमिक शिक्षण विभाग पुणे महानगरपालिका
४)पीएमपीएमएल विभाग पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with OKEN Scanner